# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/11/2021 (शनिवार)

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील मौजा साहुली शिवार येथे दिनांक 12/11/2021 चे 05.20 वा. ते 06.10 वा. दरम्यान पारशिवनी पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन पारशिवनी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–31/ डीसी– 7473 क्रमांकाच्या टाटा सफारी गाडीला थांबविले असता सदर वाहन चालक आरोपी हा वाहन सोडून पसार झाला. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये 6(गाई,कारवड) जनावरे कि. 50,000/–रू. निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 4,50,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. संदीप कडु, पो.स्टे. पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)ऐ डी एफ आय प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री सोनकुसरे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन पारशिवनीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री हृदय नारायण यादव, पालिस उपनिरीक्षक श्री सोनकुसरे, पोलीस हवालदार प्रभाकर झोड, पोलिस नाईक संदीप कडु, मुद्दसर जमाल, अमित यादव, हरिष सोनभदरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

## खून

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावरील हरनखोरी शिवार रेल्वेपूल खाली येथे फिर्यादीचा मुलगा मृतक नामे– गर्व राजु सरदार, वय 17 वर्ष रा. आंबेडकर पुतळयाजवळ अर्जुननगर काटोल यास आरोपी क्र. 1. आदित्य सुधाकर पाटील, वय 18 वर्ष, रा. काटोल, 2. अजय सुनिल भलावी, वय 19 वर्ष, 3. सुकेश रामदास उईके वय 21 वर्ष, व 4. प्रशांत अरून शेंद्रे, वय 19 वर्ष, तिन्ही रा. पेठबुधवार हेटी काटोल व इतर मित्र यांनी आरोपीची बहिण हिच्याशी प्रेमसंबंध ठेवु नये व यापुर्वी जिवाने मारण्याच्या धमक्या दिल्या होत्या. त्यानंतरही गर्व व आरोपीची बहिण यांचे प्रेमसंबंध सुरू होते. या कारणावरून मनात राग धरून आरोपीतांनी संगणमत करून गर्व यास दिनांक 12.11.2021 चे 12.30 वा. ते 12.11.2021 चे 16.45 वा. दरम्यान बाहेरगावी फोटोशुटच्या बाहन्याने बोलावुन हरणखुरी शिवार येरला धोटे रोड, रेल्वे पुलाचे खाली नेवुन धारदार शस्त्राने गळयावर कापुन व भोकसुन त्याचा खून केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रीमती वंदना राजु सरदार वय 45 वर्ष रा. आंबेडकर पुतळयाजवळ अर्जुननगर काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 302, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. आचरेकर हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावरील क्रिडा संकुल रामटेक येथे दिनांक 11.11.2021 चे 21.00 वा. ते दिनांक 12.11.2021 चे 06.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– राजुसिंग दमडुजी चव्हाण, वय 42 वर्ष रा. मानापुर ता. रामटेक हे नेहमीप्रमाणे सकाळी 06.00 वा. दरम्यान क्रिडा संकुल उघडण्यास गेले असता क्रिडा संकुलचे समोरील दाराचे कुलुप कोंडा तुटलेले दिसले. फिर्यादीने आत जावुन पाहीले असता आतमधील 5 रूमापैकी 3 रूमाचे कुलुप कोंडा तुटलेले दिसले एका रूममध्ये असलेल्या कंम्प्युटरचे 1) एचपी कपंनीचा सीपीयु किंमत 8,000/–रू., 2) एचपी कपंनीचा प्रिंटर कि. 10,000/–रू., 3) स्टेपलायजर कि. 5,000/–रू. असा एकुण कि. 23,000/–रू. चा मुद्येमाल अज्ञात आरोपीने क्रिडा संकुलमधील कुलुप कोंडा तोडुन आत प्रवेश करून चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सदाशिव काठे मो. नं. 9011326793 हे करीत आहे.

## . अपहार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 02 कि मी अंतरावरील मोजा रूची सोया कंपनी लिमीटेड उमरेड रोड येथे दिनांक 28/10/2021 चे 16.00 वा. ते 23.00 वा. आरोपी नामे– फरीद खान वल्द मीश्रु खान, वय 30 वर्ष, बालोत्रा जि बाडमेर राज्य राजस्थान याने त्याचे ताब्यातील जीजे– 12/बीडब्लु– 0825 क्रमांकाच्या ट्रॅकर मधील रिफाइंड सोयाबीन तेल 495 किलो किमंती 68,000/– रू. तेलाची अफरातफर करून नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– हितेश कुमार उर्फ दिनेश्वर केदारनाथ राव, वय 48 वर्ष, रा. गोवींद सिध्द अपार्टमेंट नरेंद्रनगर नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 407 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री मोरखडे मो.नं. 8208751249 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :– दिनांक 11/11/2021 चे 10.00 वा. दरम्यान अल्पवयीन वय 19 वर्ष फिर्यादी/पीडित हि आपले घरी घरकाम करीत असतांना आरोपी नामे– आषिश सुभाष तुमाने, वय 26 वर्ष, रा. रूईखैरी ता. जि. नागपुर याने फिर्यादीच्या घरी प्रवेश करून फिर्यादी सोबत अश्लील भाषेत बोलुन 5,000/–रू. घे आणी आतमध्ये चल असे म्हणुन फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354, 504 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि वर्षा मते मो.नं 9561695658 या करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील महाराजा लॉन समोर उमरेड नागपूर हायवे येथे दिनांक 07/10/2021 चे 08:30 वा. दरम्यान विजयशंकर ठाकुर (मृतक), वय 61 वर्ष, रा. डब्लु.सि.एल उमरेड हे त्यांची एम. एच.–40/सि.एफ–9418 क्रमांकाच्या मोटरसायकलने डब्लु.सि.एल उमरेड येथुन कावरापेठ उमरेड येथे दुध घेण्यासाठी आले होते. त्यादरम्यान महाराजा लॉन समोर उमरेड नागपूर हायवे वर त्यांची मोटरसायकल स्लिप होवुन ते खाली पडुन त्यांना दुखापत झाली. त्यांना उपचार कामी प्रथम ग्रामीण रूग्णालय उमरेड व नंतर आर.एन.हॉस्पीटल धंतोली नागपूर येथे नेले असता दि 24/10/2021 चे पहाटे 03.37 वा डॉक्टरांनी तपासुन मृत घोशित केले. मृतकच्या कागदपत्रावरून पोस्टे ला दि 28/10/2021 रोजी मर्ग क्र 61.21 कलम 174 जा.फौ अन्वये दाखल करण्यात आला.

सदर मर्ग चोकशी दरम्यान मृतकचा मुलगा राहुल विजय ठाकुर वय 29 वर्ष यांचे बयान नोंदविण्यात आले. एकंदरित मर्ग चौकशी मध्ये असे निष्पन्न होत आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक मनोज टिकाराम वाघ पो.स्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि तारूदत्त बोरसरे 9764118811 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत श्री चैतन्य राईास मिल समोर, नागपुर जबलपुर रोड डुमरी, कन्हान येथे दिनांक 12/11/2021 चे 07:15 वा. ते 07.45 वा. दरम्यान गोपीचंद नामदेवराव कांबळे (मृतक) पोहवा ब.न. 430 नेमणुक पोस्टे देवलापार, वय 51 वर्ष, रा. लता मंगेशकर रोड घ.नं. 3184 प.न. 28 पांडुरंग नगर हिगंणा रोड डिगडोह नागपुर हे त्यांची एमएच– 40/ सीई– 4480 क्रिमांकाच्या होन्डा मोटरसायकलने देवलापार कडुन कन्हान कडे येत जात असता यातील एमपी– 22/पी– 2965 क्रमांकाच्या ट्रॅव्हल्सचा चालक आरोपीने कन्हान कडुन देवलापार कडे जात असतांना आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन गोपीचंद कांबळे यांच्या मोटरसायकला आमोरासमोर धडक दिली. त्यामुळे त्यांच्या डोक्याला दोन्ही हाताला व दोन्ही पायाला जबर मार लागल्याने जागेवर मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राहुल हेमराज रंगारी, वय 36 वर्ष, रा. पोलिस स्टेशन कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134, 134 (अ) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि सुरजुसे मो.क्र. 7666640218 हे करीत आहे.

3) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 19 कि.मी. अंतरावरील मौजा मुर्ती येथे दिनांक 11/11/2021 चे 19:00 वा. दरम्यान फिर्यादीचा मित्र नामे– प्रमोद दामोदर ठेंगरे हा त्याची एमएच– 40/बीएस– 0279 क्रमांकाच्या स्पेलंडर मोटारसायकलने कारंजा वरून काटोल कडे जात होते. मौजा मुर्ती गावाजवळ काटोल कडुन कारंजा कडे जाणारा एक अज्ञात पांढऱ्या चार चाकी वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मित्राच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात प्रमोद ठेंगरे हा जखमी होवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला तसेच घटनास्थळ वरून न थांबता पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– उत्तम चंपतराव घागरे वय 39 वर्ष रा काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री राम ढगे मो क्र 9518979499 हे करीत आहे.

4) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 20 कि.मी. अंतरावरील मौजा नागपूर उमरेड रोड, व्ही.आय.टी. कॉलेज समोर येथे दिनांक 10/11/2021 चे 19:30 वा. ते 23.00 वा. दरम्यान एमएच– 49/एस– 7864 क्रमांकाचा मोटारसायकल चा चालक– प्रमोद वासुदेव अलबनकर, वय 28 वर्षे, रा. मानोरा ता. भिवापूर हा त्याची आतो बहीण च्या घरून भाउबीज ओवाळणीचा कार्यक्रम आटपुन डब्ल्यु सी एल उमरेड वरून भांडेवाडी नागपूर येथे परत जात असता मौजा भिवापूर उटी शिवारातील नागपूर ते उमरेड रोड कडे जाणा–या रोडवरील व्ही.आय.टी. कॉलेज समोर अज्ञात वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन अतिवेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकल कट मारल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटुन तो मोटार सायकल सह खाली पडुन उडाण पुलाच्या डिवायडरला धडकुण त्याच्या डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाल्याने उपचार दरम्याण मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार दिलीप लांजेवार मो. नं. 9168522014 यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि बाबुराव राउत मो. नं. 7020753909 हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. सावनेर :– फिर्यादी नामे– सौ विभा अतुल ठाकरे वय 26 वर्ष रा. बोरुजवाडा व आरोपी नामे– 1) पति– अतुल सरजेराव ठाकरे वय 35 वर्ष हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत 03 कि.मी. अंतरावर मौजा बोरुजवाडा सावनेर येथे दिनांक 16/02/2017 चे 15.00 वा. ते दिनांक 16/08/2021 चे 10.00 वा. पर्यंत आरोपी नामे– 1) अतुल सरजेराव ठाकरे वय 35 वर्ष, 2) सरजेराव पुंडलिकराव ठाकरे, वय 70 वर्ष, 3) सौ निर्मला सरजेराव ठाकरे वय 65 वर्ष तिन्ही रा. बोरुजवाडा यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. फिर्यादीने आरोपीतांविरुध्द रिपोर्ट दिली होती महिला समुपदेशन केंद्रात सुरु असुन त्यांच्यात समझोता न झाल्याने समुपदेशन केंद्र पंचायत समिती सावनेर यांच्या लेखी अहवाल फिर्यादीने पो. स्टे. सावनेर ला आणून दिल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 504, 506, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ अनिल तिवारी पो.स्टे. सावनेर मो.नं. 9689891486 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल – दिनांक 12/11/2021 चे 16.15 वा. ते 16.30 वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी हिने दिनांक 08/11/2021 रोजी दुपारी 01.30 वा दरम्यान दवाखान्यात उपचार केला आणि मुलगी/पीडिता वय 16 वर्ष हिला आपल्या वडीलांकडे ठेवुन फिर्यादी ही आपले गावी गेली. तेव्हा वडीलांकडे राहणारी फिर्यादीची बहिण हिने फिर्यादीला माहिती दिली की, मुलगी/पीडिता हि तुझ्या गावातील संशयीत आरोपी नामे– कुणाल भरतराम मुसळे रा. सोनखांब हा वा घरी आला होता व त्यानेच तिला पळुन नेल्याचा संशय असल्याचा सांगितले. त्यावरून मुलगी/पीडिता हिला आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुनिल मो.नं. 9011026414 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर